ePaper

|वर्ष - 6 ।अंक - 335|UDYAM-MH-26-0158827|

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ।शनिवार दि. 25 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चौकशीचा ससेमिरा; हसन मुश्रीफांचा वाढदिवस 'ईडी'च्या कार्यालयातच!



## आतील पानांत

- शेतकरी सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी 4 हजार विस्तारक नेमणार - संजय थोरात
- 'कोविड योद्धां'ना कायम स्वरुपी सेवेत घ्या
- राखेच्या वाहतूकीला परवानगी देणार!

# बेशिस्त वाहनचालकांना दणका!

## » वाहतूक पोलिसांचा धडाका : 442 जणांवर दंडात्मक कारवाई

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहिम राबवली या मध्ये विरुद्ध दिशेने वाहन चालवणाऱ्या 442 वाहन चालकांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कारवाई केली. पिंपरी चिंचवड शहरात दुचाकी आणि चार चाकी वाहन चालकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अनेक वाहनचालक वाहतुकीचे नियम मोडून वाहने चालवतात.**





### चलन प्रणाली द्वारे दंडात्मक कारवाई

» वाहनांवरील दंडाची रक्कम ही मोठ्या प्रमाणात अनपेड असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. या विशेष मोहिमेत वाहतूक पोलिसांनी 52 लाख 73 हजार 650 रुपयांचा दंड वसूल केला. यापुढील काळात देखील वाहतूक पोलिसांकडून अशा मोहिमा राबवून कारवाई केली जाणार आहे.

या चालकांवर कारवाई करण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी 9 ते 23 मार्च दरम्यान विशेष मोहीम राबवली. यामध्ये विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या 442 वाहन चालकांवर न्यायालयात खटले भरविण्यात आले. याव्यतिरिक्त वाहतूक नियमांचे उल करणाऱ्या नागरिकांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे मार्फत ही चलन प्रणाली द्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

# भोसरी एमआयडीसीमध्ये महावितरण दरवाढी विरोधात आंदोलन!

## » उद्योजकांची नाराजी : प्रस्तावित दरवाढ मागे घेण्याची मागणी

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**भोसरी एमआयडीसी येथील महावितरण कार्यालयाच्या बाहेर आज आंदोलन करण्यात झाले. स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. मेटल फिनिशर्स असोसिएशन पुणे, रबर असोसिएशन, फेडरेशन असोसिएशन ऑफ पिंपरी चिंचवड, पिंपरी चिंचवड महिला लघु उद्योजक संघटना या औद्योगिक संघटना एकत्रित येऊन महावितरणच्या प्रस्तावित 37% वीज दरवाढीच्या निषेधार्थ भव्य आंदोलन घेण्यात आले.**

या आंदोलनात उद्योजक आणि उद्योजिका मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी मोर्चामध्ये ही विधाने दिली, “शासनाची कुठेतरी खाजगीकरणाकडे वाटचाल चालू आहे आणि त्याचा फटका उद्योजकांना बसत असून आज उद्योगांना मंदीमध्ये खर तर संधीची गरज आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस हे चाणक्य म्हणून ओळखले जातात. परंतु, त्यांनी आपला चाणक्यपणा उद्योजकांचे उद्योग वाचवण्यात



दाखवल्यास उद्योजक त्यांचे आभार मानतील. इतर राज्यांच्या तुलनेमध्ये महाराष्ट्र राज्य विजेचे दर हे गगनाला भिडले असून विजेची चोरीसुद्धा महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात आहे.

**उद्योजक जगला तर पुन्हा राज्याला भरभराटी येईल...**

फेडरेशन ऑफ पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष गोविंद जी पानसरे यांनी शासनाचा पाठपुरावा करून महाराष्ट्रातील उद्योजक जगला तर पुन्हा एकदा राज्यामध्ये उद्योगांची भरभराट होऊन परराज्यातील उद्योग महाराष्ट्रात येण्यास प्रतिसाद देतील असे सांगितले. यावेळी पिंपरी चिंचवड महिला लघु उद्योजक संघटनेतर्फे अध्यक्ष दुर्गा भोर, उद्योजिका कांचन पंत, आणि इतर उद्योजकांनी सुद्धा आपले

### स्पर्धेत टिकण्यासाठी ‘फास्ट इकॉनोमिक ग्रोथ’

»शासनाने वीज चोरी थांबून आपला तोटा भरून काढावा. त्यासाठी उद्योजकांना भेटीस धरून महाराष्ट्रातील उद्योजक दराला कंटाळून परराज्यात स्थलांतरित होण्याचा विचार करत आहे. याच प्रकारे जर शासनाचे धोरण राहिल्यास उद्योजकांना पुढील काळामध्ये आपले उद्योग बंद करून मोठ्या प्रमाणात आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल ” मेटल फिनिशर्स असोसिएशनचे अध्यक्ष संजीव शहा यांनी महावितरणचा जाहीर निषेध करून उद्योजकांना जागतिक स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर पंतप्रधानांच्या बोलण्यानुसार जर ‘फास्ट इकॉनोमिक ग्रोथ’ करायचे असेल तर महाराष्ट्रामध्ये दर हा सर्वसामान्य उद्योजकांना परवडेल असाच पाहिजे असे सांगितले.

म्हणणे मांडले.यावेळी महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता सुरेश भोसले साहेब यांना निवेदनाद्वारे सर्व उद्योजक अध्यक्ष अभय भोर, संजीव शहा, गोविंद पानसरे, विनीत मराठे, वैभव जगताप, विजय खळतकर, मिलिंद वराडकर, महिला लघुउद्योग संघटनेच्या दुर्गा भोर, कांचन पंत, जयश्री साळुंखे या उद्योजकांच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले. यावेळी मुख्य अभियंता हे निवेदन नक्की शासन दरबारी पाठवून उद्योजकांचा विचार केला जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

# शेतकरी सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी 4 हजार विस्तारक नेमणार : संजय थोरात!

## पुणे जिल्ह्यातील 100 विस्तारकांचा समावेश असणार



"विस्तारकांमार्फत नमो महा सन्मान किसान निधी योजना, एक रूपयामध्ये पंतप्रधान पिक विमा योजना, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान, आरोग्यासाठी आयुष्यमान भारत,पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल अनुदान, महा डिबीटी द्वारे माघेल त्याला शेततळे, अस्तरिकरण, शेडनेट, हरिततग्रह, शेतीसाठी यांत्रिक औजारे अनुदान अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी एक हजार ८०० रुपये रूपये अनुदान आदी लोककल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत.'
- **संजय थोरात**, जिल्हाध्यक्ष भाजप किसान मोर्चा पुणे

। मंचर। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र व राज्य सरकारच्या अनेक नाविन्यपूर्ण व लोककल्याणकारी योजना आहेत. या योजनांचा फायदा सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेश भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुचनेनुसार प्रदेश भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात चार हजार किसान मोर्चा विस्तारक नेमले जाणार आहेत.**

पुणे जिल्ह्यातील १०० विस्तारकांचा समावेश असणार आहे. विस्तारक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संपर्क साधणार आहेत.' अशी माहिती पुणे जिल्हा भाजप किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय थोरात यांनी दिली. मंचर येथे भाजप पक्ष कार्यालयात झालेल्या बैठकीत संजय थोरात बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे संघटक सरचिटणीस माऊली शेळके, जेष्ठ नेते रविंद्र त्रिवेदी, जिल्हा सरचिटणीस नवनाथ थोरात, अंकुश गवळी, संतोष शेलार उपस्थित होते. शरद चौधरी, नानासो गवळी, दत्तात्रय मळेकर, प्रकाश देसाई, रामदास रोडे, विठ्ठल कोह्राळे, योगेश गवळी, संदिप जाधव यांनी चर्चेत भाग घेतला. 'आंबेगाव तालुक्यात भाजप किसान मोर्चातर्फे पंतप्रधान पिक विमा योजना राबविणार आहे. याबाबत काही शंका व अडचण असल्यास शेतकर्यांनी मंचर येथील भाजप किसान मोर्चा जनसंपर्क कार्यालय येथे संपर्क करावा.असे नवनाथ थोरात यांनी सांगितले. माऊली शेळके म्हणाले, 'विस्तारक नेमण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे शेतकर्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होईल.'विस्तारकांमार्फत नमो महा सन्मान किसान निधी योजना, एक रूपयामध्ये पंतप्रधान पिक विमा योजना, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान, आरोग्यासाठी आयुष्यामान भारत,पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल अनुदान, महा डिबीटी द्वारे माघेल त्याला शेततळे, अस्तरिकरण, शेडनेट, हरिततग्रह, शेतीसाठी यांत्रिक औजारे अनुदान अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी एक हजार ८०० रुपये रूपये अनुदान आदी योजना राबविण्यात येणार आहेत.'

---

# श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन सोहळा उत्साहात!

## मोशी प्राधिकरण परिसरातील नागरिकांना अभिषेक करण्याची मिळाली संधी





। मोशी। महाईन्यूज ।

**श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन सोहळा मोशी प्राधिकरण येथील श्री स्वामी समर्थ सेवा चारिटेबल ट्रस्ट संघर्ष संस्था यांच्या वतीने मोठ्या उत्साहात करण्यात आला सकाळी श्री स्वामी समर्थांचा अभिषेक करण्यात आला हा हा अभिषेक मोशी प्राधिकरण परिसरातील नागरिकांना अभिषेक करण्याची संधी मिळाली तसेच या संस्थेचे संस्थापक पंकज भाऊ पवार यांच्या अध्यक्षतेखाली अभिषेकला सुरुवात झाली.**

### महाप्रसादाचा स्वामी भक्तांनी घेतला लाभ

यानंतर सोहळ्यानिमित्त श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांची संत नगर मोशी प्राधिकरण या परिसरात पालखी काढण्यात आली यामध्ये महिला खांद्यावरती पथका घेऊन मोठ्या उत्साहात सहभागी झाल्या त्यानंतर संध्याकाळी महाआरतीचे आयोजन करण्यात आले यावेळी हजारोंच्या संख्येमध्ये भाविक भक्त उपस्थित होते आरती झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित होते उपस्थित होते. दुपारी बारा वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांचा जन्म सोहळा पार पडला या सोहळ्याला महिलांचा त्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.

### सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

» अभिषेक झाल्यानंतर श्री स्वामींना वस्त्र चढवण्यात आले त्यानंतर स्वामींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले आणि त्यानंतर होम हवन करण्यात आला.

» श्री स्वामींच्या प्रकट दिन सोहळ्यानिमित्त रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला तसेच या प्रकट दिन सोहळ्यानिमित्त मंदिराच्या जीर्णोद्धार करण्यासाठी स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली तसेच या मंदिर परिसरात दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# 'कोविड योद्धां'ना कायमस्वरुपी सेवेत घ्या!

## मुख्यमंत्री शिंदे यांना निवेदनाद्वारे मागणी, आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

|पिंपरी |
|महाईन्यूज |प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागात काम करणाऱ्या ३५० कोविड योद्धा कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घ्यावे. त्यासंदर्भात राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागात मानधनावर ५ ते १५ वर्षापासून काम करणारे आणि कोरोना काळात जीवाची पर्वा न करता काम करणा-या ३५० कंत्राटी कर्मचारी आहेत.**





या कर्मचाऱ्यांनी कोविड काळात अत्यंत प्रामाणिकपणे काम केले आहे असे असताना, महापालिका प्रशासनाकडून वैद्यकीय विभागातील वर्ग ३ व ४ च्या संवर्गात भरती प्रक्रिया राबवली जात आहे. परिणामी, स्टाफ नर्स, रुग्णवाहिका वाहनचालक, फार्मसिस्ट, इसीजी टेक्निशियन, लॅब टेक्निशियन, एक्सरे टेक्निशयन, पुरूष कक्ष मदतनीस, सफाई सेवक महिला, सफाई सेवक पुरूष अशा सुमारे ३५० कंत्राटी कामगारांवर अन्याय होणार आहे.

वास्तविक, कोविड सारख्या महामारीच्या काळात या कर्मचाऱ्यांनी जीवाची बाजी लावून आपले कर्तव्य बजावले आहे. स्टाफ नर्स आणि अन्य कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम केले आहे. प्रशासनाबाबत असलेल्या तक्रारीबाबत अनेकदा परिचारिकांनी संप पुकारला. मात्र, त्यावर मध्यस्थी करुन आरोग्य सेवा सुरळीत ठेवली होती. संबंधित वैद्यकीय कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा. या करिता संबंधित कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घ्यावे, असा ठराव दि. ३१ जुलै २०२१ रोजी मंजूर केला आहे. हा ठराव महापालिका आयुक्तांच्या स्वाक्षरीने मान्यतेसाठी आता राज्य सरकारच्या नगरविकास मंत्रालयाकडे पाठवला आहे.

दरम्यान, १३ मार्च २०२२ रोजी नगरसेवकांची मुदत संपली. निवडणूक झाली नसल्याने प्रशासकीय राजवट लागली. मानधनावरील कर्मचा-यांना कायम करण्याची प्रक्रिया प्रलंबित असतानाच महापालिका प्रशासनाने स्टाफ नर्ससह इतर तांत्रिक अशा कर्मचा-यांच्या १३१ जागांकरिता भरती काढली.

मात्र, मानधनावरील कर्मचा-यांना कायम करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. असे असताना नवीन भरती प्रक्रिया राबवणे अन्यायकारक होणार आहे. त्यामुळे राज्याच्या नगरविकास मंत्रालयाने महापालिका सर्वसाधारण सभेच्या ठरावाला मान्यता द्यावी. ज्यामुळे कोविड काळात जोखीम पत्करून कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय देता येईल, असेही आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे.

### नगरविकास विभागाच्या मंजुरीची प्रतिक्षा...

**प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (आरसीएच) अंतर्गत पिंपरी-चिंचवड महापालिकेतील मानधन तत्वावर कार्यकरत असलेल्या २२ कर्मचाऱ्यांना दि. २ नोव्हेंबर २०२१ रोजी नगर रचना मंत्रालयाने महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यास मान्यता दिली आहे. त्याच धर्तीवर वैद्यकीय विभागात काम करणाऱ्या वर्ग ३ व ४ च्या संवर्गात मानधन तत्वावर काम करणाऱ्या आणि कोविड काळात कर्तव्य बाजवलेल्या कर्मचाऱ्यांना मनपा कायम सेवेत सामावून घेता येईल. त्यासंदर्भात नगररचना विभागाने महापालिका प्रस्तावावर दिलेल्या सूचनांनुसार तांत्रिक बाजुंची पूर्तता करुन पुन्हा प्रस्ताव पाठवला आहे. त्याला मंजुरी दिल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचा प्रश्न मागी लागणार आहे, अशी माहिती आमदार महेश लांडगे यांनी दिली.**

---

# पिंपरी-चिंचवडमधील मेट्रो मार्गाच्या प्रलंबित अहवालांना मंजुरी द्या

## आमदार अश्विनी जगतापः सर्व विभागांची संयुक्त बैठक आयोजित करा, विधानसभेत मागणी

|पिंपरी|
|महाईन्यूज |प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी हिंजवडी ते चाकण मार्गावरील नाशिक फाटा ते चाकण आणि पिंपरी ते निगडी या दोन मेट्रो मार्गांचे काम सुरू होण्यासाठी तसेच शहरात मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी संबंधित असलेल्या सर्व विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी विधानसभेत केली.**



शहरातील वाहतूक प्रश्नांवर विधानसभेत बोलताना आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप म्हणाल्या, "पीएमआरडीएमार्फत सुरु असलेल्या हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो कॉरीडॉर प्रमाणेच हिंजवडी ते चाकण मेट्रो कॉरीडॉरचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून शासन मान्यतेसाठी पाठविण्यासाठी लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन नगरविकास मंत्री व आताचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीएमआरडीएच्या सर्वंकष आराखड्यामध्ये विविध कॉरीडॉरवर मेट्रो प्रणाली राबविण्याबाबत शिफारस करण्यात आल्याचे सांगितले होते. तसेच हिंजवडी ते चाकण या ३०.८ किलोमीटर मार्गावर मेट्रो मार्ग विकसित करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी आश्वासन दिले होते.

### राज्य शासनाने मंजुरी देऊन तीन वर्षाहून अधिक काळ लोटला

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सूचनेनुसार महामेट्रोमार्फत हिंजवडी ते चाकण मेट्रो मार्गातील नाशिक फाटा ते चाकण (मोशीमार्गे) या मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या मे.राईटस या संस्थेकडून तयार करून घेण्यात यावा. शहरातील वाहतूक समस्या सुरळीत होण्यासाठी महामेट्रोने केलेल्या पिंपरी ते निगडीपर्यंतच्या ४.५ किलोमीटरच्या संपूर्ण उन्नत मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाला यापूर्वीच राज्य शासनाने मंजुरी देऊन तीन वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. आता तो केंद्र सरकारच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे.**

### प्रलंबित अहवालांना तातडीने मंजुरीसाठी बैठक व्हावी

**हिंजवडी-चाकण मेट्रो मार्गिकेमधील नाशिक फाटा ते चाकण (मोशीमार्गे) या मेट्रो मार्गिकेसाठी पारंपरिक स्वरूपाच्या मेट्रोपेक्षा रबरी टायरवर धावणाऱ्या तीन डब्यांच्या मेट्रो निओ उपयुक्त ठरू शकते का याची चाचपणी करून त्यानुसार महामेट्रोकडून सविस्तर प्रकल्प अहवाल महापालिकेला सादर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शहराच्या चारही दिशांना मेट्रो मार्गांचे जाळे निर्माण करण्यासाठी मेट्रोच्या उर्वरित कॉरीडॉरचे काम सुरु होण्यासाठी तसेच प्रलंबित असलेल्या अहवालांना तातडीने मंजुरी देण्याच्या उद्देशाने शासन स्तरावर उपाययोजना करण्याबाबत सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली."**

## संपादकीय

# अंथरुण पाहून पाय पसरा

***राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी राजकीय फटकेबाजी केली; ती तूर्त बाजूला ठेवली तरी त्यांनी राज्यांच्या आर्थिक गैरवर्तनामुळे होणाऱ्या परिणामांबाबत जी चिंता व्यक्त केली, ती गंभीर आहे. या चिंतेची दखल देशातील साऱ्याच राज्यांनी घेतली नाही तर एक दिवस आर्थिक बेशिस्तीचा फटका सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सोयीसुविधा आणि सरकारी सेवांवर झाल्याशिवाय राहणार नाही.***

मग संघटितांनी असंघटितांचे केलेले शोषण असेच रूप त्याला येईल. समाजातील संघटित वर्ग हा नेहेमीच आपल्या उपयुक्ततेचे रूपांतर उपद्रवात करू शकतो. आज देशभरात विरोधकांकडे सत्ता असणाऱ्या राज्यांमध्ये जुन्या निवृत्ती वेतन योजना पुन्हा लागू करण्याच्या ज्या हालचाली चालू आहेत; त्यांच्याकडे पंतप्रधान मोदी निर्देश करीत होते. उद्या या मागणीची लाट देशभर पसरली तर सगळ्याच सत्ताधाऱ्यांवर दबाव येईल आणि आधीच नाजूक असणारे बहुतेक राज्यांचे अर्थकारण पुरते बिघडून जाईल. राजस्थान, छत्तीसगढ, झारखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या पाच राज्यांनी या आधीच राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना पुन्हा जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे ठरविले आहे. यातला पंजाब सोडून एकाही राज्याचे आर्थिक आरोग्य धड नाही. पंजाबही काही कमी संकटांनी घेरलेला नाही. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात ज्या विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या; त्यावेळच्या प्रचारात हा नव्या-जुन्या पेन्शनचा मुद्दा प्रभावी ठरला. मात्र, सर्वपक्षीय नेते याबाबत राजकारणाच्या पलीकडे जाऊन व्यापक भूमिका घ्यायला तयार नाहीत, हे दुर्दैवी आहे. हे वर्तन लोकहिताचे नाही.

देशातील काही राज्य सरकारे दोन प्रकारचे आर्थिक गैरवर्तन सध्या करीत आहेत. पहिले म्हणजे, आपल्या खजिन्याचा विचार न करता जुन्या पेन्शन योजना पूर्ववत करणे आणि दुसरे म्हणजे, मोठी, पायाभूत, दीर्घकाळ परतावा देणारी विकासाची कामे न करता समाजाला फुकटेगिरीची सवय लावणे. शिक्षण आणि औषधोपचार मोफत हे योग्य आणि आवश्यक आहे. मात्र, पाणी, वीज किंवा बसप्रवास पूर्णपणे मोफत करणे हे योग्य नाही. त्याऐवजी त्या पैशातून सुविधांचे जाळे अधिक मजबूत करायला हवे.

# ई-कचरा; नव्हे सोन्याची खाण!




**ई-कचरा हा कचरा नसून सोन्याची खाण असल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे. काय निष्कर्ष निघाला अभ्यासात? काय खरचं ई-कचरा एवढा मौल्यवान आहे, जाणून घ्या**



स्मार्टफोन, टीव्ही, कम्प्युटर, विजेवरील कार बॅटरी यांसह अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. ही उपकरणे निकामी झाल्यावर कचरा म्हणून फेकून दिली जातात. मात्र, या वाढत्या ई-कचऱ्याची चिंता साऱ्या जगाला भेडसावत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने तर याला 'कचऱ्याची त्सुनामी' असे संबोधले आहे. एका ताज्या अभ्यासानुसार, अमेरिकेत गेल्या दशकापासून दरवर्षी जवळपास एक अब्ज इलेक्ट्रॉनिक उपकरणे कचऱ्यात टाकली जातात. मात्र, हा कचरा नव्हे, तर सोन्याची खाणच असल्याचे विश्लेषणातून समोर आले आहे. कारण हा कचरा म्हणजे सोने चांदी, तांबे, पेलेडियम, कोबाल्ट, प्लॅटिनम, निओडायमिअमसारखा दुर्मिळ धातू, उच्च प्रतीचे ॲल्युमिनियम आणि जस्त यांचा स्रोत आहे.

एक टन वजनाच्या स्मार्टफोनमध्ये एक टन सोन्याच्या खनिजापेक्षा शंभर पट अधिक सोने असते. मात्र, पुनर्वापराच्या अत्याधुनिक तंत्राअभावी हा मौल्यवान धातू अक्षरशः कचऱ्यात फेकला जातो. ई-कचऱ्याचा योग्य पुनर्वापर केला, तर त्यापासून मोठ्या प्रमाणात मौल्यवान धातू मिळू शकतात. असे झाले, तर सोन्यासाठी नवीन खाणी खोदण्याची गरज राहणार नाही, असे अमेरिकेतील 'नॅशनल लॅबोरेटरी'मधील संशोधनात समोर आले आहे. 'नेचर सस्टेनेबिलिटी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

सध्या, जगभरातच पुनर्वापराची प्रक्रिया खूपच दुर्लक्षित आहे. जगभरात ८० टक्के ई-कचरा जमिनीत पुरला जातो. त्यामुळे हे मौलिक धातू मातीमोल होतात. केवळ २० टक्के ई-कचऱ्याचा पुनर्वापर होतो. जगभरातील सात टक्के सोने ई-कचऱ्यात असून ई-कचऱ्याची किंमत वर्षाला ६२.५ दशकोटी डॉलर आहे. हा आकडा काही देशांच्या जीडीपीपेक्षाही अधिक आहे. अमेरिकेत दरवर्षी २२० टन सोने खाणीतून काढले जाते, त्याच्या निम्मे सोने या ई-कचऱ्यातून मिळू शकेल.

भारतात ९५ टक्के ई-कचऱ्यामधील प्लास्टिक जाळून हे मौल्यवान धातू वेगळे काढले जातात. मात्र, ही पद्धत अत्यंत प्राथमिक असून त्यातून खूपच कमी धातू हाती लागतात. तसेच, यामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे पुनर्वापरयोग्य आणि सुरक्षित उत्पादने विकसित करणे गरजेचे आहे. उत्पादकांनीच 'बाय बॅक' सारख्या योजना राबवणे उपयुक्त ठरेल.

# जागे व्हा, निसर्गाचे संकेत ओळखा!

**कधी नव्हते एवढे तापमान यंदाच्या फेब्रुवारी महिन्यात अनुभवण्यात आले. आजवरच्या तापमानाचा उच्चांक या महिन्यात झाला. उच्चांकी तापमान वाढीनंतर आता उच्चांकी अवकाळी पावसाची वेळ आलेली आहे. सर्वसाधारणपणे खूप उच्च तापमानानंतर थोडाफार अवकाळी पाऊस कोसळतो किंबहुना ते निसर्गचक्र देखील म्हणता येईल.**

पण गेल्या अनेक दिवसांपासून जणू पावसाळ्याप्रमाणे कोसळणाऱ्या पावसाच्या माध्यमातून निसर्ग आपल्याला काही संकेत देऊ पाहतोय. हा संकेत आपण समजावून घेण्याचा प्रयत्न करायला हवा अन्यथा भविष्य भीषण स्थितीकडे जाऊ शकते. लढाई आत्मसन्मानाची...

पाऊस, आर्द्रता आदी वैज्ञानिक नोंदी जगात अलीकडे म्हणजे साधारण दीडशे वर्षांपासून ठेवल्या जाऊ लागल्या. पण या तापमान नोंदीत किती अचूकता आहे, हे ठामपणे अजून कोणी सांगू शकत नाही. त्याचं कारण म्हणजे तापमान मोजण्याची पद्धत. सर्वोच्च तापमान मोजायचं झाल्यास सावलीत, हिरवळीवर तापमान मोजले जाते.

ब्रिटिशकाळापासून चालत आलेली ही पद्धत आहे. या पद्धतीमुळे प्रत्यक्ष शेतात किंवा रस्त्यावर, डोक्यावर किती उष्णता आहे हे नेमकेपणाने कळत नाही, असे शास्त्रज्ञांचा एक



गट मानू लागला आहे. जे आकडे दिले जातात, त्यापेक्षा अनुभवलेले तापमान ३ ते ५ अंशांनी जास्त असते, असे काही शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

पण जर ही बाब पुढच्या काळात सर्वमान्य झाली, तर आपण मानवजातीला माफ करू शकणार नाही. कारण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल. हीच परिस्थिती अवकाळी पावसाबाबतची आहे. कधी नव्हे एवढा पाऊस भर मार्चमध्ये अनुभवायला येतोय.

शेतीचे प्रचंड नुकसान या पावसामुळे होत आहे. अतिशय वेगाने बदलणारे हे निसर्गचक्र वेगाने समजून घ्यायला हवं. निसर्गाचा असमतोल या सगळ्याच्या मुळाशी आहे, हे गृहीतक मानून त्या संदर्भात तातडीने कार्यवाही सर्व स्तरांवरून व्हायला हवी.

नाशिकसह राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये कारच्या माध्यमातून हजारो टन कार्बन उत्सर्जन होत आहे. कार्बन उत्सर्जनासाठी कार सर्वांत प्रमुख कारण आहे. आपण किती वेगाने सार्वजनिक वाहतूकव्यवस्था मजबूत करू शकू, त्यावर पर्यावरणाचं निम्म चक्र अवलंबून आहे.

आपल्याला काँक्रिटचे रस्ते आवडत असले तरी देखील ही सर्वांत भयाण गोष्टींपैकी एक आहे. काँक्रिटमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान रोखायला हवे. मुंबईतील माहीमच्या रस्त्याचं उदाहरण त्यासाठी प्रातिनिधिक ठरतं. १८४५ मध्ये मुंबईची बेटे व उपनगरे जोडणारा 'लेडी जमशेटजी' रस्ता, ज्याचा मिठी नदीवरचा पूल हा भाग आहे, तो बांधला गेला. सुमारे १७५ वर्षांपूर्वी बाधलेला हा ऐतिहासिक रस्ता डांबरी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राखेच्या वाहतूकीला परवानगी देणार!

## » "मुंबई-पुणे हायवेवर होणार नाही अपघात, फडणवीसांनी सांगितला उपाय !

। मुंबई। महाईन्यूज ।

**नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा आणि कोराडी वीज केंद्रांलगतच्या गावांमध्ये राखेमुळे होणारे प्रदूषण गंभीर पातळीवर गेले आहे. यासंदर्भात उमा खापरे यांनी आज विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला. यावर आता राखेच्या वाहतुकीला परवानगी देणार असल्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला सांगितले.**

फडणवीस म्हणाले, म्हणाले, या प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात राख तयार होते. पण त्या तुलनेत वापर होत नाही. आता आपण राखेच्या वाहतुकीला परवानगी देणार आहोत. नाशिकमध्ये मागणी आहे. पण राख नाही. पण आता त्यांची मागणी पूर्ण होणार आहे. हे सांगताच काही सदस्यांनी इतर प्रश्न उपस्थित केले.

अभिजित वंजारी यांनी कोळसा वाहतूक, सतेज पाटील यांनी रस्ता सुरक्षा, भाई जगताप यांनी मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक, अनिकेत तटकरे यांनी एक्सप्रेस वेवर स्पीड गन, एकनाथ खडसे यांनी प्रकल्पग्रस्तांना राख मोफत देणे, तर महादेव जानकर यांनी जुन्या मुंबई -पुणे रस्त्याच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले.



कोळशाच्या वाहतुकीसाठी नवीन सीसीटीव्ही आणि व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम केली आहे. कोळशाची गाडी थांबली तर किती वेळ थांबली, डी रुट केला का? काही काही रस्त्यांवर अनलोड होते मग कोळशात गोटे टाकले जातात. हे प्रकार होतात. पण नवीन सिस्टिममुळे ते होणार नाहीत, असे फडणवीसांनी सांगितले. कुणी प्रकल्पग्रस्त उद्योग करणार असतील तर सवलतीच्या दरात त्यांना राख देऊ. पण ट्रेडिंगकरीता देणार नाही. गैरव्यवहार झाला असेल तर पत्र द्या. कारवाई करू, असे त्यांनी खडसेंच्या प्रश्नावर सांगितले.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आयटीएमएस सिस्टीम तयार होत आहे. १०० टक्के सीसीटीव्हीवर दिसेल. मोटरसायकलवाले कर्मचारी ट्रक आणि ट्रेलर्सवर कारवाई करतील. ते रॉंग साईड येऊन लवकर कारवाई करू शकतात. आत्ताही अशा वाहनांवर कारवाई करत आहेत. आयटीएमएस सिस्टम पूर्ण झाल्यावर त्याचा उपयोग होईल.

रस्ता सुरक्षा सप्ताहाप्रमाणे वर्षभरही तसेच काम केले पाहिजे. पण कायद्याचा प्रश्न आहे. दंडाची वसुली केली नाही. तर नोटीस कालबाह्य होते. २०० कोटीपेक्षा जास्त रक्कम सरकारला दंडातून मिळते. अजून तेवढीच रक्कम येणे बाकी आहे. मोबाईल अपडेशनच्या सूचना देऊ, असे फडणवीसांनी सांगितले.

### मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आयटीएमएस सिस्टीम

» मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आयटीएमएस सिस्टीम तयार होत आहे. १०० टक्के सीसीटीव्हीवर दिसेल. मोटरसायकलवाले कर्मचारी ट्रक आणि ट्रेलर्सवर कारवाई करतील. ते रॉंग साईड येऊन लवकर कारवाई करू शकतात. आत्ताही अशा वाहनांवर कारवाई करत आहेत. आयटीएमएस सिस्टम पूर्ण झाल्यावर त्याचा उपयोग होईल. रस्ता सुरक्षा सप्ताहाप्रमाणे वर्षभरही तसेच काम केले पाहिजे. पण कायद्याचा प्रश्न आहे. दंडाची वसुली केली नाही. तर नोटीस कालबाह्य होते. २०० कोटीपेक्षा जास्त रक्कम सरकारला दंडातून मिळते.

### व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम

»कोळशाच्या वाहतुकीसाठी नवीन सीसीटीव्ही आणि व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम केली आहे. कोळशाची गाडी थांबली तर किती वेळ थांबली, डी रुट केला का? काही काही रस्त्यांवर अनलोड होते मग कोळशात गोटे टाकले जातात. हे प्रकार होतात. पण नवीन सिस्टिममुळे ते होणार नाहीत, असे फडणवीसांनी सांगितले. कुणी प्रकल्पग्रस्त उद्योग करणार असतील तर सवलतीच्या दरात त्यांना राख देऊ. पण ट्रेडिंगकरीता देणार नाही. गैरव्यवहार झाला असेल तर पत्र द्या. कारवाई करू, असे त्यांनी खडसेंच्या प्रश्नावर सांगितले.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर बहुतेक वेळेला वाट्टेल तशा गाड्या चालतात. विशेष करू घाटात छोट्या गाड्यांना जायला जागाच नसते. पहिल्या लेनमधून जाऊ नये लिहिले आहे. पण मोठी वाहने जातात. कठोर पावले उचलली, कठोर शासन केले. तरच काही होऊ शकते.

# नाशिकमध्ये कोरोनाची धाकधूक वाढली!

## » एकाच दिवशी कोरोनाचे चौदा रुग्ण, आरोग्य विभाग सतर्क

।नागपूर महाईन्यूज ।

**गेल्या आठवड्यापासून नाशिक शहरात (NASHIK) अचानक कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढू लागली असून, त्यातच आज शुक्रवारी एकाच दिवशी चौदा बाधित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणेला धडकी भरली आहे. तर नाशिक शहर व ग्रामीण भागातील रुग्णसंख्येने अर्धशतक पार केल्याने नागरिकांचीही धाकधूक वाढली आहे.**

गेल्या काही दिवसांपासून नाशिक शहरासह जिल्ह्यात एच3 एन2 (H3N2) या नवीन विषाणूने थैमान घातले आहे. त्यातच या रुग्णामध्नून नव्याने कोरोनाबाधित (CORONA UPDATE) रुग्ण आढळून येत असल्याने आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. आरोग्य विभागाने कोरोनाचे सातत्याने रुग्ण वाढत असताना जोडीला देशपातळीवर घातक मानल्या गेलेल्या एच3 एन2 या नवीन विषाणूचेही दोन रुग्ण आढळल्याने संख्या नऊवर पोहोचली. दरम्यान हवामानातील बदलामुळे सर्दी, खोकला, तापाचे रुग्ण वाढले, सरकारी आणि खासगी दवाखान्यात गर्दी होऊ लागली तर काही रुग्णांना कोरोना सदृश लक्षणे जाणवू लागल्याने त्यांचे नमुने घेतले असता, त्यांना कोरोना झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

आरोग्य विभागाने सर्दी, खोकल्याच्या रुग्णांची कोरोना



तपासणी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे दररोज सहा ते दहा बाधित रुग्ण सापडू लागले आहेत. मात्र यातील एक रुग्णाचा अपवाद वगळता इतर सर्व रुग्णांना सौम्य लक्षणे दिसून आली आहेत. ते घरातच विलगीकरणात उपचार घेत असल्याचे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. कोरोनाचे संकट घोंगावत असतानाच देशपातळीवर भीती निर्माण करणाऱ्या एच3 एन2 या नवीन विषाणूने बाधा झालेले चार रुग्णही शहरात आढळले आहेत. दरम्यान एच3 एन2 हा नवीन विषाणूदेखील हवेतून संसर्ग फैलावत असल्यामुळे केंद्र सरकारने सर्व राज्यांना दक्षतेच्या सूचना दिल्या आहेत. नाशिक शहरात कोरोनाचे रुग्ण वाढू लागले आहेत. गुरुवारी एकाच दिवसात अकरा तर गेल्या सोमवारी एकाच दिवसात बारा रुग्ण आढळले. तर आज शुक्रवार रोजी एकूण 14 कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. नाशिक शहरात रुग्णांच्या प्रमाणात होत असलेल्या वाढीमुळे नागरिकामध्येही धास्ती वाढली आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागात सहा रुग्ण सापडले आहेत.

### एच3 एन2 च्या विषाणूची भर

»कोरोना बरोबरच एच3 एन2 या नवीन संसर्गित विषाणूचे ही रुग्ण शहरात सापडले आहेत. खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाच्या नमूने तपासासाठी पाठवले असता, आतापर्यंत नऊ रुग्णामध्ये त्याची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यातील सात रुग्ण उपचाराअंती घरी गेले असून, दोन रुग्णावर उपचार केले जात आहेत. त्यामुळे नागरिकांनी तोंडावर मास्क लावावे, सुरक्षित अंतर ठेवावे व हात स्वच्छ धुवावेत, गर्दीत जाणे टाळावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# राहुल गांधींची खासदारकी रद्द!

## 2024 लोकसभा निवडणुकीत मोदी यांना टक्कर देण्यासाठी विरोधी पक्षातील कोणत्या नेत्याचा पर्याय ?

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांना शिक्षा झाली आहे. त्यांची खासदारकी रद्द झाली आहे. शिक्षा कायम झाली तर ते पुढे आठ वर्षे निवडणूक लढवू शकणार नाहीत. त्यामुळे २०२४ ला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टक्कर देण्यासाठी विरोधी पक्षातील कोणत्या नेत्याचा पर्याय असेल याची चर्चा सध्या सुरु झाली आहे.**



नरेंद्र मोदी हे दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले त्यावेळी भाजपच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील अनेक दिग्गज नेते पंतप्रधान बनण्यास इच्छूक होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे तर गुडघ्याला बाशिंग बांधूनच तयार होते. मात्र नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता बघता त्यांच्याच गळ्यात दुसऱ्यांदा पंतप्रधान पदाची माळ पडली. मोदी यांचा कारभार सुरु असताना त्यांना टक्कर देण्यासाठी विरोधी पक्षातील अनेकांची नावे पुढे आली. राज्याच्या राजकारणात भाजपला टक्कर देणाऱ्या अनेक नेत्यांचे पंतप्रधान पदासाठी त्यांच्याच कार्यकर्त्यांनी नाव जाहिर केले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची नावे आघाडीवर होती.

या नेत्यांमध्ये शरद पवार हे ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत. तर ममता बॅनर्जी ह्या आक्रमक आहेत. त्यामुळे यांच्यापैकी कोणाची वर्णी पंतप्रधान मोदी यांना शह देण्यासाठी लागेल हे बघावे लागेल.

### चोराला चोर म्हणणं गुन्हा ठरला-उद्धव ठाकरें

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाल्यानंतर ठाकरे गटाची पहिली प्रतिक्रिया आली आहे. उद्धव ठाकरे यांनी तिखट प्रतिक्रिया देत भाजपचा समाचार घेतला.लोकसभा सचिवलयाने राहुल गांधी यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. त्यांची खासदारकी रद्द करण्यात आली आहे. मानहानीच्या खटल्यात सूरतच्या जिल्हा कोर्टानं राहुल गांधींना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यामुळे राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्यात आली आहे. या कारवाईनंतर ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे म्हणाले की, चोराला चोर म्हणणं हा आपल्या देशात गुन्हा ठरला आहे. ही हुकूमशाहीच्या अंताची ही सुरुवात असून सर्व सरकारी यंत्रणा दबावाखाली आहेत. आता लढाईला दिशा द्यावी लागेल, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली आहे.

तसेच आपचे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचेही नाव पंतप्रधान पदासाठी चर्चेत राहिले आहे. त्यांनी दिल्लीचा केलेला कायापालट व राबवलेल्या जनहिताच्या योजना यामुळे त्यांची लोकप्रियता देशभरात आहे. मात्र आप भाजपची बी टीम असल्याचा आरोप होतो आहे. त्यामुळे विरोधी पक्ष त्यांना पाठिंबा देईल का याची शाश्वती नाही. सर्व विरोधकांचे सूर जुळले तर पंतप्रधान पदासाठी राहुल गांधी ऐवजी कोणाची वर्णी लागेल हे बघावे लागेल.

### भ्याड, सत्तेच्या भुकेल्या हुकूमशहापुढे कधीही झुकणार नाही: प्रियंका गांधीं



**काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मोदी आडनावावरून आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी गुरुवारी सुरत जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर आज त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच ढवळले असताना काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. मोदींनी संसदेत संपूर्ण गांधी कुटुंबाचा आणि काश्मिरी पंडित समाजाचा अपमान केला होता. मात्र त्यांना शिक्षा किंवा अपात्र ठरवले नही, असे प्रियांका गांधी म्हणाल्या. प्रियंका गांधींनी एकामागून एक चार ट्विट करत राहुल गांधींच्या लोकसभा सदस्यत्व रद्द झाल्याबद्दल आपला संताप व्यक्त केला. प्रियंका म्हणाल्या की, 'तुमच्या चमचांनी एका शहीद पंतप्रधानाच्या मुलाला देशद्रोही, मीर जाफर म्हटले. तुमच्याच एका मुख्यमंत्र्यांनी राहुल गांधीचे वडील कोण? असा प्रश्न उपस्थित केला. कश्मीरी पंडितांच्या परंपरेनुसार, एक मुलगा वडिलांच्या मृत्यूनंतर डोक्यावर पगडी घालतो आणि आपल्या कुटुंबाची परंपरा जपतो.' मात्र मोदींनी संसदेत गांधी कुटुंब आणि कश्मीरी पंडितांचा अपमान करताना ते नेहरू आडनाव का लावत नाही, असा प्रश्न विचारला होता.**

---

# सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राचं गिफ्ट!

## महागाई भत्ता 4 टक्क्यांनी वाढला; सरकारवर पडणार 'एवढा' बोजा

। नवी दिल्लीः।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठं गिफ्ट देत महागाई भत्त्यामध्ये वाढ केली आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी असून महागाई भत्ता ३८ टक्क्यांवरुन ४२ टक्के करण्यात आलेला आहे.**





केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांसाठी केंद्र सरकारने खूशखबरी दिली आहे. केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामधअये ४ टक्के वाढ केलीय. डीए आणि डीआरएमध्ये ही वाढ जानेवारी २०२३ पासून लागू होईल.

मोदी सरकारच्या कॅबिनेटने घेतलेल्या या निर्णयानंतर महागाई भत्ता ३८ टक्क्यांवरुन ४२ टक्के झाला आहे. पूर्वलक्षी प्रभवाने ही वाढ लागू होणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसह पेन्शनधारकांना याचा लाभ मिळेल.केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सरकारवर १२ हजार ८१५ रुपयांचा बोजा पडणार आहे. केंद्राच्या या निर्णयाचा फायदा ४७.५८ लाख कर्मचाऱ्यांना होणार आहे. तर ६९.७६ लाख पेन्शनधारकांनाही या निर्णयामुळे लाभ होईल. डीएमध्ये झालेली ही वाढ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनंतर करण्यात आलेली आहे.

# शरद पवारांच्या निवासस्थानी विरोधकांची बैठक

## ईव्हीएम मशीनविरोधात पुन्हा एकदा आवाज उठवणार

। दापोली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, राज्यसभेचे खासदार शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी विरोधी पक्षातील नेत्यांची बैठक गुरुवारी (दि. २३ मार्च) संपन्न झाली. निवडणूक आयोगासमोर जाऊन इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनबाबत (ईव्हीएम) विरोधकांचे आक्षेप पुन्हा एकदा लेखी स्वरूपात मांडण्याचा ठराव या बैठकीत संमत झाला.**



जगातील प्रत्येक मशीनमध्ये गडबड केली जाऊ शकते, या आपल्या जुन्या विचारावर विरोधक अद्यापही ठाम असल्याचा पुनरुच्चार या बैठकीत करण्यात आला. या बैठकीला काँग्रेस समाजवादी पक्ष, जेडीयू, आप, सीपीआय, सीपीएम, शिवसेना (यूबीटी), बीआरएस, आययूएमएल या पक्षातील नेते आणि कपिल सिब्बल उपस्थित होते.

या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह म्हणाले की, निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांच्या मनातील ईव्हीएम मशीनबद्दलची शंका समजून घ्यावी. ईव्हीएम मशीन्स या बाह्ययंत्रणेशिवाय (STANDALONE) चालणाऱ्या आहेत, असे निवडणूक आयोग सांगत असले तरी ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार करता येतो. इंटरनेटच्या माध्यमातून ईव्हीएम मशीनवरील नावे आणि पक्षाच्या चिन्हामध्ये गडबड होऊ शकते. तसेच या पत्रकार परिषदेत शरद पवार म्हणाले की, विरोधकांची अपेक्षा आहे की, निवडणूक आयोगाने आमच्या मागणीची दखल घ्यावी. सिब्बल म्हणाले की, मागच्या काही काळात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, ज्यांची उत्तरे निवडणूक आयोगाकडून येणे अपेक्षित आहे. सिब्बल पुढे म्हणाले, "आम्ही पुन्हा एकदा निवडणूक आयोगापुढे जाऊ. निवडणूक आयोगाने आम्हाला लेखी उत्तर द्यावे, अशी मागणी करणार आहोत.

# मंगेशकरांच्या संगीत सेवेपुढे कोणताही पुरस्कार छोटाच!

केवळ भारतच नाहीतर जगभरामध्ये ज्यांच्या आवाजाची जादू कायम आहे त्या आशाताई भोसले यांना आज मुंबईमध्ये महाराष्ट्र भुषण पुरस्कारानं गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भारतरत्न सचिन तेंडूलकर, सुधीर मुनगंटीवार, सुरेश वाडकर, जॅकी श्रॉफ, उदित नारायण उपस्थित होते.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार आशा ताईंना देताना आम्हाला खूप आनंद होतो आहे. आपण अनेकवेळा व्हर्सेटाईल शब्द वापरतो.त्या शब्दाची व्याख्या म्हणजे आशा ताई आहेत. त्यांनी गायलेली गाणी खूप अवीट आहे. त्यांनी भक्तीगीत ते पॉप, रॉक पर्यत सर्व प्रकारची गाणी त्यांनी गायली आहेत. त्यांनी त्यांचे वैशिष्ट्य सातत्यानं जपले आहे.

वीस भाषांमध्ये त्यांनी गाणी म्हटली आहेत. हजारो गाणी त्यांनी गायली आहेत. त्या प्रत्येक गाण्यात त्यांनी वेगळेपण जपले आहेत. शतकामध्ये दुसऱ्या आशा भोसले होत नाही. मंगेशकर कुटूंबियांनी जी संगीताची सेवा केली ती अविस्मरणीय आहे. कुठलाही पुरस्कार त्या सेवेपुढे छोटाच आहे. आपलेपण पोहचवण्याचा छोटासा प्रयत्न आहे. असेही फडणवीस म्हणाले.सर्वोत्तम गायिका आशा भोसले आहेत. आताच्या तरुण पिढीच्या आयकॉनिक गायिका म्हणूनही त्यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी आवाजातील विविधता जपली आहे. आशा ताईंच्या गाण्याबद्दल सांगायचे झाल्यास त्यांनी श्रोत्यांना खूप स्वरानंद दिला. एकाच दिवशी सात गाणी गाण्याचा विक्रम आशा भोसले यांचे नाव घेता येईल. या शब्दांत फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.





# उर्फी जावेद अडकणार लग्न बंधनात?

उर्फी जावेद ही असं नाव आहे ज्याबद्दल जास्त माहिती द्यायाची गरज नाही. ती तिच्या अतरंगी फॅशनमुळे सर्वांनाच परिचीत आहे. ती नेहमी अशी काही फॅशन करते जी पाहिल्यानंतर तिच्या कल्पनाशक्तीवर विश्वासच बसत नाही. मात्र नुकताच तिने एक फोटो सोशल मिडियावर पोस्ट केला आहे. हा तिच्या फॅशनचा किंवा तिच्या कपड्याबद्दल नसून तो तिच्या रिलेशनशिपबद्दल आहे.

होय उर्फी जावेद कुणाला तरी डेट करत असल्याच तिनं म्हटलंय. उर्फी जावेदने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला ज्यावर फुलांचा गुच्छ आहे आणि लिहिलेलं आहे की, त्यानं होय म्हटलं.

ही पोस्ट पाहिल्यानंतर सोशल मीडियावर तिच्या रिलेशनशिपचे वारे वाहु लागले. नेटिझन्सने लगेचच उर्फीला तिचा जोडीदार सापडला असल्याचा अंदाज लावला. या पोस्टवर तिने हृदयाचा एक इमोजी देखील बनवला, ज्याला पाहून लोक उर्फीला तिचा पार्टनर भेटला असं म्हणतं आहे. आता सोशल मिडियावर तिच्याच नावाची चर्चा सुरु झाली आहे. मात्र उर्फीनं त्यावर असं काही लिहिलेल नाही की ती रिलेशनशिपमध्ये आहे किंवा लग्न करणार आहे. अद्याप तरी तिनं याबद्दल काहीच स्पष्ट सांगितिलेलं नाही. मात्र, सोशल मीडियावर अनेक युजर्सने मुलगा कोण असा प्रश्न तिला विचारणं सुरु केलं आहे.

अनेकांनी तिचं अभिनंदन केलयं तर एकाने लिहिले की असा खजिना कोण सोडेल? तर दुसऱ्याने लिहिले की तो भाग्यवान मुलगा कोण आहे? तर एकानं थेट तिला लग्न कधी आहे असाच सवाल केला आहे. निदान त्याला तरी चांगले कपडे घालू दे असा सल्लाही काहींनी तिला दिला आहे. उर्फी जावेदची पोस्ट पाहिल्यानंतर चाहते वेगवेगळ्या पद्धतीने कमेंट करत आहेत.

# तुम्ही मला श्रावणी दिली तर मी.. जिनिलियाची सर्वांसमोर अहोंना गोड हाक

सध्या झी गौरव पुरस्कार २०२३ ची जोरदार चर्चा आहे. या पुरस्कार सोहळ्यात रितेश देशमुख आणि त्याची बायको महाराष्ट्राची लाडकी वहिनी जिनीलीया देशमुख यांची एकदम हवा आहे.

नुकताच या दोघांचा एक व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल झालाय. या व्हिडीओत जिनीलियाने सर्वांसमोर तिच्या लाडक्या अहोंना गोड अंदाजात हाक मारली.झी गौरव पुरस्कार २०२३ पुरस्कार सोहळ्यातला एक व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झालाय. या व्हिडीओत जिनीलियाच्या हातात पुरस्कार असुन तिला लोकप्रिय अभिनेत्री चित्रपट हा पुरस्कार मिळाला आहे.

हा पुरस्कार मिळताच जिनीलियाला खुप आनंद झाला. पुढे सर्वांचे आभार मानताना जिनीलियाने रितेशकडे पाहीलं आणि गोड स्माईल दिलं.पुढे जिनीलिया रितेशकडे बघत म्हणाली, अहो.. तुम्ही मला श्रावणी दिली तर मी तुम्हाला हे ॲवॉर्ड देणार. लव्ह यू असं म्हणत जिनीलियाने रितेशचे आभार मानले आहेत. हे ऐकताच सर्वांनी जिनीलयाचे कौतुक केलं. अगदी अशोक सराफ, सचिन पिळगावकर यांनीही टाळ्या वाजवल्या. पुढे श्रेयस तळपदेने रितेशला स्टेजवर विचारलं... रितेश स्टेजवर गेला आणि तो जिनीलियाच्या पाया पडला.



# पदर पडला, चाहत्यांच्या नजरा वळल्या!

सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असणारी बॉलीवूडची सेलिब्रेटी म्हणून मलायकाचं नाव घ्यावं लागेल. चाळीशी पार करुन पन्नाशीच्या जवळ आलेल्या मलायकाच्या फिटनेसचं तिच्या चाहत्यांना कौतूक असतं. काही (MALAIKA ARORA) दिवसांपासून मलायका वेगवेगळ्या प्रकारचे फोटो शेयर करत आहे. त्या फोटोंवर चाहते खूश झाले आहे. अशातच मलायकाच्या साडीतला एक लूक समोर आला आहे. त्यात तिच्या साडीचा पदर पडल्यानंतर नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंटसही मोठ्या गंमतीशीर आहेत. मलायका - अर्जुन कपूरच्या व्हॅकेशन फोटोंना देखील नेटकऱ्यांनी भन्नाट कमेंटस् दिल्या होत्या.मलायकानं हटकून भलतेच बोल्ड फोटोशुट केलं आहे. तिच्या बोल्ड फोटोंना चाहत्यांचा प्रतिसाद मिळतो आहे. पदर पाडून केलेलं ते फोटोशुट तिच्या चाहत्यांना भावले आहे. तासागणिक मलायकाच्या त्या फोटोंना प्रतिक्रिया मिळताना दिसून आल्या आहेत. वयाच्या 48 मध्ये देखील मलायकाचं अशाप्रकारचे फोटोशुट पाहून तिचे चाहते भारावून गेले आहेत. बॉलीवूडमध्ये फिटनेस फ्रीक म्हणून तिच्या नावाचा उल्लेख केला जातो. चाहत्यांना नेहमीच फिटनेसचं महत्व सांगून हेल्दी राहण्यासाठी मलायका वेगवेगळ्या पोस्टही शेयर करताना दिसते. काही दिवसांपासून मलायका आणि अर्जुन कपूरच्या लग्नाची चर्चा व्हायरल झाली आहे.



# दुनिया हिला देंगे हम!

## हरमनच्या मुंबई इंडियन्सची थाटात फायनलमध्ये एन्ट्री

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सलग पाच विजयांसह महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या सत्रात दमदार सुरुवात करणाऱ्या मुंबई इंडियन्सने अखेर अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबईने WPL च्या पहिल्या सत्राच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. एलिमिनेटर सामन्यात मुंबईने यूपी वॉरियर्सचा 72 धावांनी एकतर्फी पराभव केला. मुंबईच्या विजयात नॅट सिव्हर-ब्रंटची अष्टपैलू कामगिरी आणि इझी वोंगची हॅटट्रिक यांचा मोठा वाटा होता.**

विजेतेपदासाठी मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. हा सामना 26 मार्चला मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळल्या जाईल आहे. गुणतालिकेत अव्वल दोन संघच अंतिम फेरीत आमनेसामने येतील. मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे. यूपीने तिसरे स्थान मिळवून एलिमिनेटरमध्ये प्रवेश केला होता.

यूपी वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईने 20 षटकांत 4 बाद 182 धावा केल्या. प्रत्युत्तरात यूपीचा संघ 17.4 षटकांत 110 धावांवर गारद झाला. नताली स्कायव्हर ब्रंटच्या नाबाद 72 आणि इस्सी वोंगच्या हॅट्ट्रिकमुळे मुंबईने शानदार विजय मिळवला. इस्सी वॉंगने चार षटकांत 15 धावा देत चार बळी घेतले. महिला प्रीमियर लीगमध्ये हॅट्ट्रिक घेणारी ती पहिली खेळाडू ठरली. तिने किरण नवगिरे, सिमरन शेख आणि सोफी एक्लेस्टोनला बाद करत हॅट्ट्रिक पूर्ण केली.तत्पूर्वी, मुंबई इंडियन्सने यूपी वॉरियर्ससमोर 183 धावांचे कठीण लक्ष्य ठेवले होते. मुंबईने 20 षटकांत 4 बाद 182 धावा केल्या.

नताली सीव्हर ब्रंटने शानदार खेळी करत 38 चेंडूत नाबाद 72 धावा केल्या. यादरम्यान त्याच्या बॅटमधून नऊ चौकार आणि दोन षटकार निघाले. अमेलिया केरने 19 चेंडूत 29, हीली मॅथ्यूजने 26 चेंडूत 26 आणि यास्तिका भाटियाने 18 चेंडूत 21 धावा केल्या.

'करो या मरो'च्या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौरची बॅट शांत राहिली. तिने 15 चेंडूत 14 धावा केल्या. शेवटच्या षटकात



पूजा वस्त्राकरने चार चेंडूत 11 धावा केल्यानंतर नाबाद राहिली. यूपी वॉरियर्सकडून सोफी एक्लेस्टोनने दोन तर अंजली सरवानी आणि पार्श्वी चोप्रा यांना प्रत्येकी एक विकेट घेतल्या.

# सांगलीची प्रतीक्षा बागडी ठरली पहिली महिला महाराष्ट्र केसरी

## वैष्णवी पाटीलवर केली मात, पहिली महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा सांगलीत पार

। सांगली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सांगलीची प्रतीक्षा बागडी ठरली पहिली महिला महाराष्ट्र केसरी, महाराष्ट्रात पहिल्यांदाच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. सांगली येथे ही महिला कुस्ती स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सांगलीतील प्रतीक्षा बागडी आणि कल्याणमधील वैष्णवी पाटील यांच्यात अंतिम लढत झाली. या लढतीत प्रतीक्षा बागडीने वैष्णवी पाटीलला चितपट करत पहिली महिला महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला आहे.**



सांगली-मिरज रस्त्यावरील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये महिला महाराष्ट्र केसरी पदकासाठी कुस्ती स्पर्धा गुरूवारपासून सुरू होत्या. अंतिम सामन्यात तुंग (जि.सांगली) येथील बागडी आणि पाटील यांच्यात लढत झाली. सायंकाळी ही अंतिम लढत सुरू झाली. या अंतिम सामन्यात बागडी व पाटील मध्यंतरापर्यंत चार गुणांनी बरोबरीत होत्या.

मात्र, मध्यंतरानंतर बागडीने पाटीलला चितपट करीत चार विरुध्द दहा गुणांनी महिला केसरी पदकावर मोहोर उमटवली.तत्पुर्वी, सकाळी झालेल्या उपांत्य सामन्यात बागडी हिने कोल्हापूरच्या अमृता पुजारी हिचा ९ विरूध्द २ गुणांनी पराभव करीत अंतिम लढतीत प्रवेश केला होता. तर, दुसऱ्या कुस्तीमध्ये वैष्णवी पाटीलने वैष्णवी कुशाप्पाचा ११ विरूध्द १ अशा गुंणांनी पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती.

# कोलकातासाठी दुष्काळात तेरावा!

। कोलकाता। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीग 2023चा हंगाम सुरू होण्यापूर्वी कोलकाता नाइट रायडर्स संघाचं टेन्शन पुन्हा वाढलं आहे. पाठीच्या दुखापतीमुळे संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर या संपूर्ण मोसमातून बाहेर पडणे जवळपास निश्चित असताना, या हंगामात संघाचा भाग असलेला वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनला दुखापत झाल्याची बातमीही समोर आली आहे. त्याचबरोबर केकेआर संघाचा आणखी एक खेळाडू नितीश राणालाही सराव सत्रादरम्यान दुखापत झाली आहे.

कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या खेळाडूंनी घरच्या मैदानावर ईडन गार्डन्सवर सराव सुरू केला आहे, यामध्ये आतापर्यंत संघातील अनेक महत्त्वाचे खेळाडू सामील झाले आहेत.

